# लाटा



आसावरी काकडे

# लाहो

आसावरी काकडे

कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ४११०३०

ई प्रकाशन
ई साहित्य प्रतिष्ठान

# लाहो

**कविता संग्रह : आसावरी काकडे**

**प्रकाशक**
अनिरुद्ध अनंत कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ४११०३०

**मुद्रणस्थळ**
स्टेप इन सर्विसेस
४७ ब, तोफखाना चौक
पुणे ४११००५

**अक्षर रचना**
रेखा कुलकर्णी
आर. एम. टाईपसेटर्स, १२०४/२५, शिवाजीनगर
पुणे ४११००४

मुखपृष्ठ चित्र ; स्वाती कापुसकर
मुखपृष्ठ व आतील मांडणी : गणेश विसपुते

प्रकाशन क्रमांक ११६६
ISBN : 81-7421-064-4

सर्व हक्क सुरक्षित

प्रथमावृत्ती : २ मे १९९५ (अक्षयतृतीया)
मूल्य : पन्नास रुपये

ई-पुस्तक- २५ फ़ेब्रुवारी २०२२ (ई साहित्य प्रतिष्ठान)

# लाहो

हा कवितासंग्रह ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान कवयित्री सौ. आसावरी काकडे यांचे आभारी आहे.

या पुस्तकाचे ई प्रकाशन व विनामूल्य वितरण करण्यास परवानगी दिल्याबद्दल आम्ही कॉन्टिनेन्टल प्रकाशनच्या देवयानी अभ्यंकर यांचे आभारी आहोत.

धन्यवाद

सुनीळ सामंत
टीम ई साहित्य
esahity@gmail.com
www.esahity.com
Whatsapp: 99877 37237

**केलिया फावला ठायींचा तो लाहो**
**तृष्णेचा तो काहो काव्हवितो..!**

**- संत तुकाराम**

## मनोगत

ऋतुचक्राप्रमाणे आनंद-उल्हास, व्यथा-वेदना, भीती-अस्वस्थता.. देणारे क्षण आलटून पालटून आपल्या आयुष्यात येत असतात. जगणं अर्थपूर्ण करत असतात. आनंदाचे, तृप्तीचे क्षण मनाची उमेद वाढवतात, तर वेदना अंतर्मुख करते. कधी कधी तृषार्त मनाला कशाची तहान आहे हेही उमगेनासे होते तेव्हा अस्वस्थता येते. या अनाकलनीय अवस्थेत शब्द-संवाद होऊ शकला तर शांत होता येते. मनाने अनुभवलेल्या आर्त, उत्कट क्षणांच्या तळाशी जाऊन पुन्हा काठावर तटस्थपणे स्थिरावता आले तर शब्दात व्यक्त होता येते. गेल्या तीन-चार वर्षातील अशा काही क्षणांना साक्षी असलेल्या कवितांचा हा संग्रह ‘लाहो’.

लाहो म्हणजे ध्यास. संत तुकारामांच्या गाथेतला हा शब्द. आपल्यातील आंतरिक मर्यादांच्या पार होण्याच्या संदर्भात मला तो भावला आणि कवितासंग्रहाचे शीर्षक म्हणून मनात रुजला. ‘अधीरता’, ‘आक्रोश’, ‘खंत’, ‘अतृप्ती’ अशा याच्या आणखी काही अर्थछटा समजल्या तेव्हा तर हे शीर्षक अधिकच अर्थपूर्ण वाटले. कारण अशा भाव-कल्लोळातच कवितेचा उगम होत असतो.

‘आरसा’, ‘आकाश’ नंतरचा ‘लाहो’ हा माझा तिसरा कवितासंग्रह. यातील कवितांची मांडणी काहीशी हेतूपूर्वक केलेली आहे. एक सलग अनुभव देणाऱ्या कविता अनुक्रमात सलगपणे घेतल्या आहेत.

हा संग्रह आकार घेत असताना मला अनेक मैत्रिणींची अनेक तऱ्हांनी मदत झाली. विशेषतः अश्विनी बर्वे आणि विनीता पिंपळखरे यांची. पहिल्या संग्रहापासूनच नव्हे तर पहिल्या कवितेच्या जन्मवेळेपासून या माझ्या सोबत आहेत.

कवितासंग्रहाचे मुखपृष्ठ-चित्र स्वाती कापुसकरचे आहे, तर मुखपृष्ठ आणि आतील कलात्मक मांडणी गणेश विसपुते यांची आहे. या दोघांनी हे काम अतिशय आत्मीयतेने केले.

पहिल्या दोन्ही संग्रहासारखीच याही संग्रहाची सुरेख निर्मिती वैजयंती ढोले आणि सुरेखा वागळे यांच्या सहकार्याने झाली. आर. एम. टाईपसेटर्सच्या सौ. रेखा कुलकर्णी यांनी अक्षर जुळणीचे काम व्यवस्थित रीतीने पार पाडले.

कॉन्टिनेन्टल प्रकाशनचे श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांनी पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी आस्थेने पार पाडली.

या सर्वांची मी ऋणी आहे.

***

२ मे १९९५ रोजी हा कवितासंग्रह प्रकाशित झाला होता. त्याच्या छापिल प्रती आता उपलब्ध नाहीत म्हणून ई पुस्तकरूपात आता तो प्रकाशित करावा असं मनात आलं. ई साहित्य प्रतिष्ठानच्या सुनील सामंत यांनी या कल्पनेला दुजोरा दिला. आणि प्रकाशनाची जबाबदारी स्विकारली. त्यांच्या हार्दिक सहकार्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद.

-आसावरी काकडे
‘सेतू’ डी १/३,
स्टेट बँक नगर, कर्वेनगर,
पुणे ४११०५२
फोन: ९७६२२०९०२८ व ९४२१६७८४८०

# अनुक्रम


१) मी स्वतः साक्षी आहे
२) अथांग तंद्रीच्या डोहात
३) स्वतःभोवती
४) रानात उमलावे
५) नकळता रुजतेच
६) घरंगळून जावे
७) घरात, अवती-भवती
८) सुसाट धावण्यासाठी
९) या बर्फाच्या भिंतीमध्ये
१०) मला नुकतीच जाग आलीय
११) कसा कळेना
१२) डोळयादेखत झडून गेले
१३) गळून पडलेलं फूल
१४) खोद आणखी थोडेसे
१५) मनातील क्षीण आक्रोशांना
१६) आता भीती वाटत नाही
१७) माझ्या आत्ममग्न कोषातील
१८) तुमचा विश्वास बसणार नाही
१९) शब्दांना मोगरीचा ...
२०) आपल्यामधे जुळू लागलेल्या
२१) तुझ्या विश्वाच्या परीघावर
२२) उमगू नये आपल्यालाही
२३) मी लिहू जाते
२४) आता उतरेल सांज
२५) आपल्यातील संवादाच्या सुरवातीलाच
२६) चिंब निथळलेल्या रस्त्यावर
२७) मी आकंठ बुडालेली
२८) माझ्याही नकळत

२९) आपल्यातील अनेकपदरी नाते
३०) रे नकोस होऊ दाता
३१) अगदी निरागस मातीतून
३२) हे दुःख कशाचे
३३) चित्रातील रिकाम्या जागेत
३४) मी ऐकलेच नाही
३५) ऐन पावसाळ्याच्या सुरवातीला
३६) सरपटणाऱ्या प्राण्यांप्रमाणे
३७) एका गावाची हद्द....
३८) कधी अचानक
३९) कधी कधी दिसत नाही
४०) माझ्या ओंजळीत
४१) उचललेल्या प्रत्येक पावलात
४२) श्वास माझे....
४३) सुख सुद्धा दंश करतं
४४) न उकललेले प्रश्न
४५) चल आपण जगण्यावरती प्रेम करूया
४६) अचानक कोसळले संकट
४७) सारी आवराआवर करून
४८) जाता जाता
४९) शब्दांची पाखरं
५०) पंचेंद्रियांची शक्ती
५१) गर्भश्रीमंत म्हणून....
५२) आपला जन्मांधपणा
५३) तो अजस्त्र काळा कातळ
५४) अथांग निळया आकाशाचं प्रतिबिंब
५५) विविधरंगी असत्याचे
५६) पुन्हा बरसले
५७) कवितेला तर नाहीच
५८) ऋतूंचे उरी फूटून....
५९) काल परवापर्यंत

६०) इंद्रधनुषी रंगांचे चक्र
६१) शरीरात जागोजाग
६२) भर रस्त्यात
६३) समोरचा हा वृक्ष
६४) दे अपार तृष्णा
६५) बुंध्याशी बांधलेल्या
६६) शिंपल्याच्या दारापाशी
६७) या विश्वाच्या
६८) पापण्यांची कवाडं
६९) दूरात डोंगरावरती
७०) वर्षे नुसती जात नाहीत
७१) प्रचंड गतिमान शक्ती
७२) बाहूंना दिलीयस
७३) हे मधले अंतर
७४) कित्येक असे जे
७५) हरलेल्यांनो
७६) निर्गुण निराकार ईश्वरालाच
७७) मला चिकटलेले
७८) जसे अनंताचे गाणे
७९) त्या डोंगरावरून
८०) एखाद्या हिमनगाने

पूर्वप्रसिद्धी

साप्ताहिक सकाळ, महाराष्ट्र टाईम्स, तरुण भारत, दीपावली, राजहंस, बहिणाई, कविताश्री, मिळून साऱ्याजणी, पिसारा, अंबर, अभिमानश्री.

१

मी स्वतः साक्षी आहे
पण कळत नाहीय
ही तडफड कसली !
काही उगवते आहे नव्याने
जमिनीचे निबर कवच फोडून ?
की विस्कटते आहे सारे आतून ?
कळत नाही
धुवाधार कोसळणारा हा पाऊस
हलवून, जागी करून
शांतविणार आहे तृष्णा ?
की वाहून नेणार आहे
जमविलेले सारे ?
कळत नाहीय
व्हावे सन्मुख वेदनेला
अपार करुणेचे बाहू पसरून
की मौनच बरे ?
**

२

अथांग तंद्रीच्या डोहात
उमलताहेत
सुगंधी कमळं !
अनावर दरवळताहेत.
साद घालताहेत
अधीरपणे !
मी बरसू पाहातेय त्यांवर
दवबिंदू होऊन.
पण गोठण्याचा वसा घेतलेल्या मला
वितळता येत नाहीय !
**

३

स्वतःभोवती
स्वतःचीच मिठी
आणि आर्त दिठी
क्षितिजाशी

येई अंधपण
उघडीता नेत्र
म्हणूनी हे गात्र
मिटलेले

कोण देते शाप
कोणत्या हेतूने
आंतर भीतीने
कातावले.
**

४

रानात  उमलावे एखादे छोटेसे फूल.
कळूही नये कुणाला
त्याच्या रूपगंधाची वार्ता !
मोकळेपणाने हसावे त्याने
निर्मळ, निःसंदर्भ !
डुलावे स्वानंदात अनोळखी वाऱ्यावर.
शांतपणे साजरे करावे स्वतःपुरते
आपले काही घटकांचे अस्तित्व !
मला हेवा वाटतो कधीकधी
अशा निर्हेतुक उमललेल्या फुलाचा !
असीम विश्वाच्या तुलनेतील
आपल्या नगण्यतेची
दखलही न घेण्याच्या
त्याच्या स्वाभाविक वृत्तीचा पडतो मोह !
तरी,
मी जात नाही त्याच्याकडे.
घेत नाही त्याचा वसा.
मळलेल्या वाटेनेच चालत राहाते
नि कुणीतरी ढकलल्यासारखी
भोवतीच्या गर्दीत मिसळत राहाते !
**

५

नकळता रुजतेच
मनामध्ये काहीबाही
त्याला अनावरपणे
फुटू द्यायचेच नाही

हाती ताणलेले धनू
पण बाण रोखायचा
आणि पूर आला तरी
पुन्हा बांध घालायचा

कोण पेरते उद्रेक
इंद्रियांच्या मातीमध्ये ?
आणि जागता पहारा
देत कोण मनामध्ये ?

नको ताणलेले धनू
किंवा सुटू देना बाण
देह फुलू दे मातीत
किंवा जाऊ देत प्राण !
**

६

घरंगळून जावे
असे वाटले
की किती सहज
ओघळते पाणी
कुठूनही !
आपण मात्र बंदिस्त
देहाच्या आकारात !
**

७

घरात, अवती-भवती माणसं नसली
की स्वप्नातही येईनाशी होतात !

रस्त्यावर मैलोनमैल पुढे-पाठीमागे
आजुबाजूला कुणीही नाही !
तरी भीती कुणाची वाटते ?
हवेही असते कुणी सोबतीला
तरी भीती,
कुणाच्या अनाहूत येण्याचीच वाटत असते !

चालण्यासाठी दोन पावलं असतात
हे किती बरं !
एकाकी चालताना तेवढीच सोबत
एकमेकांना एकमेकांची !

दृष्टी पोचेल तिथवर कुणीही नाही.
कुणी येण्याची शक्यताही नाही !
अशा वेळी किती सोबत वाटते
भिरभिरणाऱ्या पाखरांची !
एरव्ही ही कुठे असतात ?
**

८

सुसाट धावण्यासाठी
वेग रोखून
सिग्नलशी थांबलेल्या वाहनांसारखे
ओथंबलेले शब्द
आवेग रोखून
उभे आहेत मनाआड
कोण जाणे कुठल्या इशाऱ्याची वाट पाहात !
**

९

या बर्फाच्या भिंतीमध्ये
चिणले आहे गाणे
त्याच्यासाठी एक पाखरू
घेउन आले दाणे

उभे पेटले रान भोवती
तरी भिंत वितळेना
थरथरणाऱ्या ओठांवरले
शुष्क मौन संपेना

चोचीमध्ये अधीर दाणे
गाणे रडते आत
गतजन्मांचे वैर साधते
ही बर्फाची भिंत

उगमापाशी असते तसली
ओढ अनावर व्हावी
गोठगोठली उब आतली
वितळुन मुक्त व्हावी !
**

१०

मला नुकतीच जाग आलीय
नि भोवती कुंद हवा दाटलीय
बंद घराच्या खिडक्या
हळुहळू मोकळ्या होतायत.
मी थोडी उत्सुक,
थोडी धास्तावलेली.
आता आतली गदगद
सरपटत बाहेर पडेल
आणि एखादं वादळ
दार उघडून आत येईल !
**

११

कसा कळेना
आज बरसला
मेघ पांढरा

काय वितळल्या
वळचणीतल्या
निवल्या गारा ?

असे अचानक
मेघातून त्या
काय बरसले ?

रंध्रारंध्रातून
मनाच्या
अंकुर फुटले !

अन भरला की
आंतरातला
आसुसला घट

भरल्यावरती
कळले, होता
रिताच की घट !
**

१२

डोळ्यादेखत झडून गेले
अवघ्या वृक्षावरचे पानन्‌पान
भणंगपणाचा जळजळीत दाह सोसत
उभेच राहिले त्याचे इमान!
तेव्हा कुठे
पुनर्जात वृक्षाच्या फांदीफांदीवरले
प्रत्येक देठ
कोवळ्या फुलाने डंवरून आले !
अन लख्ख उमगले मला-
रोमारोमातून उमलून यायचे
तर कणाकणानी
आधी पूर्णपणे रिक्त व्हायला हवे !
**

१३

गळून पडलेलं फूल
पुन्हा
चिकटवता येत नाही फांदीला
जमिनीत गाडून घेऊन
अवघं आस्तित्व
पुन्हा उगवावं लागतं त्याला !
**

१४

खोद आणखी थोडेसे
खाली असतेच पाणी
धीर सोडू नको, सारी
खोटी नसतात नाणी.

घट्ट मिटू नये ओठ
गाणे असते गं मनी
आर्त जन्मांचे असते
रित्या गळणाऱ्या पानी.

मूठ मिटून कशाला
म्हणायचे भरलेली
उघडून ओंजळीत
घ्यावी मनातली तळी.

झरा लागेलच तिथे
खोद आणखी जरासे
उमेदीने जगण्याला
बळ लागते थोडेसे !
**

१५

मनातील क्षीण आक्रोशांना
मी तेज धार देऊ शकते !
नमवू शकते पायाशी
माझं जग,
मला हवं तसं !
तरीही मी शांत आहे.
सोशिक आहे पूर्वीसारखीच !
कारण
माझ्यातून उगवलेल्या सामर्थ्याला बिलगून
एक उत्कट समजही
माझ्यापाशी आलेली आहे.
आणि
मी आवाज उठवू शकते
या आत्मविश्वासाने
सोशिकतेच्या तळाशी असलेला
दुर्बलतेचा संदर्भ पुसून टाकला आहे !
**

१६

‘आता भीती वाटत नाही मला पानगळीची’
तू म्हटलेस.
तेव्हा मी समजून घेतला
तुझ्या मनातील
उद्याच्या बहराबद्दलचा विश्वास !
नि मोहरून आले मीच
अगदी नखशिखान्त !
पण तू मात्र होतीस स्वस्थ !
शांतपणे समजावलेस मला-
‘सखी,
पानगळ हीही एक ‘अवस्था’ आहे
जिचा अनुभव
अधिक श्रीमंत करतो आपल्याला.
हातचं काही राखत नाही
थोडं अधिकच देतो दान
जे बहराजवळ असत नाही !’
**

१७

माझ्या आत्ममग्न कोषातील सूक्ष्म थरथर
दुर्लक्षीत करणं
अशक्यच झालं अगदी
म्हणून डोकावलं जरा बाहेर-
तुफानी रात्रीपूर्वीचा संधीकाल
आणि संदिग्ध शांतता
विनाशाची चाहुल घेत,
वरून स्तब्ध
पण आतून अनावरपणे विस्कटत
सर्वभर पसरलेली !
भीतीची एक असह्य कळ
लकाकून गेली विजेसारखी उभ्या देहातून !
मग
मी भूतकालातील अनेक उत्पातांनंतरच्या
पुनर्वसनाच्या कथा आठवल्या,
प्रचंड अडथळे पार करत,
वळसे घेत,
अखंडपणे धावणाऱ्या संस्कृतीच्या प्रवाहाचा
चिवट इतिहास आठवून पाहिला
आणि स्वस्थ होत
पुन्हा आपल्या वाटेने चालू लागले !
**

१८

तुमचा विश्वास बसणार नाही कदाचित
पण या निबिड अंधाराच्या तळाशी
एक पणती तेवते आहे.
आपल्या किलकिल्या नजरेने
अंधार निरखते आहे.
कधी बावरते ती
त्याच्या अथांग दर्शनाने
तर कधी बाळगते उमेद
त्याला भेदून वर येण्याची !
कधी सुखावते
अंधाराचे ओझे पेलताना
त्याच्याकडे निरखून पाहाण्यासाठी
प्रकाशाचे डोळे लाभले म्हणून
तर कधी व्याकूळ होते
ओझे असह्य झाले तरी
अंधारात हरवून जाता येत नाही म्हणून !
तुमचा विश्वास बसणार नाही कदाचित
पण
या निबिड अंधाराच्या तळाशी
एक पणती तेवते आहे.
स्तब्ध अंधार डहूळते आहे !
**

१९

शब्दांना
मोगरीचा निर्वेध गंध देऊन
मी तुझ्या ओटीत घातलं होतं !
तुला
गुलाबाचा काटेरी गंध
कुठून आला ?
**

२०

आपल्यामधे जुळू लागलेल्या
नव्या नात्याची चिमुकली नाव
संभ्रमाच्या अथांग पाण्यात घालताना
मी कसनुशी झाली आहे !
माझे सज्ज सुकाणू
मी सर्व ताकदीनिशी
हातात गच्च धरून ठेवले आहे.
अनेकांच्या सवयीचे असलेले
हे पाणी तितकेसे गढूळ नाही.
शिवाय
दुरून न दिसणारी आतली खळबळ
आणि बसणारे हेलकावे
यांना न जुमानता
आतापर्यंत अनेक नावा
पैलतीरापर्यंत सुखरूप गेल्याच्या
कितीतरी नोंदी
परंपरेच्या बासनात
स्वच्छ नोंदलेल्या आहेत !

तरीही
पाणी संभ्रमाचेच आहे
आणि आपली पुरती ओळखही नाही
आपल्या सुकाणूची ताकद

आपण आजमावलेली नाही
आणि आपल्या सामानाचीही
आपल्याला हवी तशी माहिती नाही !
एकमेकांच्या सोबतीनं
थोडं पुढं गेल्यावर,
आपले अंदाज चुकले
आणि नाव हेलकावे घेऊ लागली
तर कुणाच्या स्वप्नांचे ओझे कमी करायचे
हेही आपले ठरलेले नाही !
म्हणून
मी जरा बावरलेच आहे
आपली चिमुकली नाव
या अथांग पाण्यात घालताना !
**

२१

तुझ्या विश्वाच्या परीघावर
कुठेतरी मी
नगण्यपणे !
हे पुरेपूर ठाऊक असलेल्या
माझ्या विश्वाच्या केंद्रबिंदूशी असतोस तू
सहजपणे !
माझे सारे श्वास तुझ्यात अडकलेले !
तू कुठे कुठे भिरभिरताना
मी रेंगाळत असते तुझ्याच भोवती !
तुला भेडसावतात संकटं
तेव्हा मी दचकते, कावरी बावरी होते.
नि तू पहाडासारखा उभा असतोस- अचल !
तुझे अपमान मी झेलते वरच्यावर
आणि अपयशाची वाट रोखून धरते.
तुझे सारे क्लेश सोसता सोसता
मी पुरती वाकून जाते !

अन तू वावरत असतोस ताठ मानेने
काहीच न घडल्यासारखा !
पण तुझे सारे व्यापताप आवरून
तू परत येतोस आपल्या घरकुलात
आणि सारे काही विसरून
माझ्या कुशीत शिरतोस
तेव्हा मात्र

तुझ्या विश्वाच्या केंद्रबिंदूसह
साऱ्या परीघावर
असते फक्त मी ! फक्त मी ! !
**

२२

उमगू नये आपल्यालाही
आपल्या अस्वस्थतेचे कारण...
भिडू नये हृदयाला
रोज खिडकीशी येणाऱ्या
पाखराचे गाणे...
अनोळखी असावेत
दुतर्फा झुलणारे वृक्ष
नेहमीच्या वाटेवरले
किंवा
वर्षानुवर्षे वास्तव्य असूनही
अपरिचितच राहावेत
कितीतरी रस्ते
एखाद्या शहरातले
तसा आहेस तू !
**

## २३

मी लिहू जाते
एक उत्कट गहिरी प्रेमकविता-
आठवू पाहाते,
सुंदर स्वप्नांसारखे
तुझे डोळ्यांत असणे...
टपटपणाऱ्या प्राजक्त फुलागत
हळुवार बरसणे..
मैलोन मैल पसरलेल्या लांबच लांब अंतरासारखे
वाट पाहाणे व्याकुळ होऊन,
नि अचानक कधीतरी
तुझे वळवासारखे धुवाधार कोसळणे...
पण त्यातले काहीच फुटत नाही
माझ्या शब्दातून अनावरपणे !
मी लिहू जाते अशी एखादी प्रेमकविता
तेव्हा आठवणींच्या प्रत्येक पानावर
सापडतात मला
आपल्यातील अंतराच्याच खुणा
समजुतीने बुजवलेल्या
कधी तू.. कधी मी...
मग मी लिहून टाकते कविता
आपल्यातील अंतराचीच-
जमिनीवरल्या आपल्याला लख्ख उमगलेल्या
आणि जमिनीखालच्या
आपण समजून घेतलेल्या !
**

२४

आता उतरेल सांज
क्षितिजाच्या काठावर
पसरेल सावळासा
दाही दिशात अंधार

दीप उजळव सखी
करूनिया तेलवात
थोडा खेळूदे प्रकाश
आसावल्या अंगणात

नको मागचे रुसवे
काढू अवेळीस अशा
बघ मोकळ्या किती या
सांजवेळेच्याही दिशा

आता हळुहळू करू
स्वच्छ आकाश मनाचे
आणि रंगवू त्याच्यात
चित्र केशरी उद्याचे !
**

२५

आपल्यातील संवादाच्या सुरवातीलाच
तू अगदी
माझ्या मनातलं बोललास,
हातात हात घालून चालण्याविषयी !
पार्थिवापलिकडला हा अर्थ
तुझ्याही मनात जागला
हे किती बरं झालं !
तसे पूर्वीही होतोच आपण शहाणे
देत-घेत होतो एकमेकांना बरेच काही
आपापल्या परीने.
तेव्हाही प्रेम होतेच
तू माझा म्हणून,
मी तुझी म्हणून !
पण आज
एकमेकांतून मोकळे होण्याची गरज
तुलाही समजली,
मी न समजावता
हे किती बरं झालं !
आता आपलं प्रेम अधिक समंजस होईल-
तू तुझा म्हणून
मी माझी म्हणून !
**

२६

चिंब निथळलेल्या निःशब्द रस्त्यावर
कोसळत होता संततधार पाऊस !
एका लयदार आवेगात कोसळणाऱ्या
त्या पाऊसधारा
जमिनीला स्पर्शताच
उमलून येत होती
नि मृदगंध उधळीत
निमिषार्धात विरघळूनही जात होती
थरथरती पारदर्शी पाणफुले !
आपल्याच तंद्रीत
घराच्या खिडकीतून मी पाहात होते
रस्त्यावरचा तो विलक्षण खेळ !
त्या वेळी
माझ्या तंद्रीत होतास तू,
बाहेर कोसळत होत्या
तुझ्या आठवांच्या सरी
अन मृद्‌गंध उधळीत
निमिषार्धात विरघळून जाणारी
थरथरती पारदर्शी पाणफुले
दिसत होती
तू दिलेल्या आनंदासारखी !
**

२७

मी आकंठ बुडालेली
स्वतःत
मन बर्फाचे करून.
तू यायचे नव्हतेस
इतक्यात
धगधगती आस होऊन !
**

२८

माझ्याही नकळत
मी तुला साद घालत राहीन.
तू येणार नाहीस.
येण्याचं आश्वासनही देणार नाहीस.
तरी माझ्यातल्या साद घालणारीला
ते कळणार नाही !
ती रंगवत बसेल चित्र
तू खरंच आल्याचं,
आणि मनमुक्त मारेल गप्पा !
सांगेल वाचलेल्या नव्या पुस्तकांबद्दल.
विचारेल तुला अवेळी होणाऱ्या पानगळीबद्दल,
आत्ममग्न कवितेबद्दल,
किंवा उद्याच्या लहरी बहराबद्दल...
आणि मग तुझ्या जागी जाऊन
समजावेल... तुझ्या शैलीत.
उठेल हसून.
किंवा अश्रूही गाळेल त्याच अर्थाचे !
निश्वासेल नकळत
तृप्त, अतृप्तशी...!
प्रत्यक्षात तू येशील... न येशील !
**

२९

आपल्यातील अनेकपदरी नाते
मी लपेटू पाहाते तुझ्याभोवती
परोपरीने !
फुलवू पाहाते तुला
तुझ्या सुगंधासह.
जागवू पाहाते तुझ्यातील विजिगिषू वृत्ती.
ममतेनं देते तुला आधार कोसळत्या क्षणी...
मी देते तुझ्या हातात हात,
खेळते तुझ्याबरोबर सारे खेळ.
वादविवाद करते, स्पर्धा करते
नि जिंकतेही बरेचदा !...
मी पाहाते तुझी कोवळी स्वप्ने
आपल्या स्वप्नांची झालर लावून !
तुझ्यातील उसळते सृजन
सांभाळते उरीपोटी
आणि निर्माण करते आपली प्रतिकृती !
टिकवू पाहाते जीवनाचे सातत्य !...
मी चालतच राहाते तुझ्याबरोबर
केव्हाही, कुठेही !

सारे रसरसते आवेग ओसरल्यावर
नितळ माणूसपणाचे संदर्भ उरतात
तेव्हाही, मी लपेटतेच तुझ्याभोवती
आपल्यातील हे अनेक पदरी नाते

माझ्यापरीने !
तुला जाणवते ना हे सारे ?
कळते ना ऊब वेगवेगळ्या पदरांतली ?
की तुझ्यासाठी असते मी
केवळ एक गृहीत
वातावरणातल्या हवेसारखी ?
**

३०

रे नकोस होऊ दाता
मी याचक नाही उरले
ते दान-पात्र नावाचे
आयुष्य भोगुनी झाले

उद्रेक शांत झालेले
नभ निरभ्र आहे आता
पांघरून वाळू, धरती
निःसंगच उरली आता !

पण विन्मुख नकोस जाऊ
क्षण देउन जा सलणारे
हे अग्निकुंड जन्माचे
ना कधी विझू देणारे !
**

३१

अगदी निरागस मातीतून
उमलून आलेली असली
किंवा निर्हेतुक जुळून
तशीच रुळत राहिली
तरी जुनी होतातच नाती !
अन जुनी झाली की विरतात
नातीसुद्धा !
कितीही काळजीपूर्वक विणलेली असली तरी
किंवा समंजसपणाच्या धाग्यांनी
पुन्हा पुन्हा सांधली तरी !
पण यात
दोष कुणाचाच नाही !
आपण समजूनच घ्यायला हवं
की नात्यालाही आयुष्य असतं !
**

३२

हे दुःख कशाचे
कळतहि नाही पुरते
वेढुनी मनाला
असह्य झोके देते !

हे खरेच पाणी
की हे मृगजळ आहे
संभ्रमात वेड्या
तहान वाढत आहे !

हे असेच सारे
ओझे हवे-नकोचे
देठातच विरते
स्वप्न फूल होण्याचे !
**

३३

चित्रातील रिकाम्या जागेतील कॅनव्हास
झाकून टाकण्यासाठी द्यावा निळा रंग,
आणि म्हणावे
हे आकाश !
तसे माखून टाकायचे चैतन्य
रंग उतरलेल्या मेंदीसारख्या
फिकट आवेगावर,
आणि गायचे
मनात न उगवलेले
उपरे गाणे !
झुलवायचे स्वतःला
हवे-नकोच्या झोक्यावर,
नि झुलत-गुणगुणत
चालत राहायचे
आयुष्य नावाच्या सरळ रेषेवरून !
ही फसवणूक स्वतःची ?
की शहाणपण ?
कळत नाही.
आणि
रोज नवे गुणगुणायचे तरी काय ?
खरंच सुचत नाही !
**

३४

मी ऐकलेच नाही त्याचे सुरेल गाणे
मग वेड लावती का ते सूर जीवघेणे ?

मी ऐकणार नाही
मज सोसणार नाही
लावून स्वप्नवेध त्याचे निघून जाणे !

शोधीत ज्यास गेले
ते भाग्य दारि आले
सोडून हातचे पण स्वीकारले भटकणे !

राहीन एकटी मी
साहीन कोषही मी
उमलून शक्य नाही मज गंध तो लपविणे !!
**

३५

ऐन पावसाळ्याच्या सुरवातीला
तू हे काड्यांचं घरटं बांधलंयस
गृहित संकटाच्या झुलत्या फांदीवर
आणि निःशंक भरारी घेतो आहेस
आकाशात दूरवर !
चिमणचारा घेऊन तू परतशील
तेव्हा असेलही सुखरूप
तुझं घरटं, तुझी पिलं !
पण हे औटघटकेचं वरदान,
जगून साजरं करताना
भविष्यकालीन विनाशाची
कुठलीच भीती
चुकचुकत कशी नाही
तुझ्या मनाच्या वळचणीत ?
जगत्या क्षणांचे मोती,
भूत-भविष्याच्या धाग्यात न गुंफता
मोकळेपणानंच टिपून घ्यायचं कसब
कुणी शिकवलं तुला ?
**

३६

सरपटणाऱ्या प्राण्यांप्रमाणे
टिपू नयेत पाखरांनी
जमिनीवरचे दाणे.
आकाशातच शोभते
त्यांच्या चोचीतले
निरागस गाणे !
**

३७

एका गावाची हद्द ओलांडून गेल्यावर
दुसऱ्या गावाच्या हद्दीत पाय ठेवेपर्यंतचा
मधला रस्ता...
रस्त्याच्या दोन्ही बाजूला
क्षितिजापर्यंत पसरलेली विस्तीर्ण भूमी...
तिवर कुठे शेतं
कुठे विरळ विरळ झाडे
कुठे नदी, कुठे ओहोळ...
मधेच कुठेतरी भटकणारी जनावरे
आणि भिरभिरणारी पाखरे...
या साऱ्यावर सारख्याच अलिप्तपणे पसरलेले
अथांग निळे आकाश !
एस.टी. च्या खिडकीला डोके टेकवून
एका गतीमान लयीत
हा चलच्चित्रपट
स्तब्धपणे निरखत असताना,
अचानक दिसले,
आणि दिसेनासेही झाले

एक छोटेसे देऊळ,
नि त्यातला कुणीतरी लावून ठेवलेला दिवा !
केव्हा, कुणी अन का
लावला तो दिवा तिथे ?

असले प्रश्न पडायच्या आत
मी प्रसन्न झाले
आणि विराजमान झाला तो दिवा
मनाच्या गाभाऱ्यात
स्वयंभू असल्यासारखा !
**

३८

कधी अचानक
वाटुन जाते
जगून झाले सारे
दहा दिशांहुन
काय आणखी
नभात असते न्यारे ?

परंतु केव्हा
कण मातीचा
नवा नवा वाटतो
देहामध्ये
खोल रुजुनिया
प्राण पुन्हा जन्मतो !
**

३९

कधी कधी दिसत नाही दृष्टीला
एखाद्या गृहितासारखे पसरलेले
माथ्यावरचे निःसंग आकाश
नि त्याखाली
निळ्या नादात भिरभिरणारी पाखरे !
आपल्या नावाचे आयुष्य सावरीत
बोथट नजर धावत असते नाकासमोर
आणि अटळ दुःखासारखा
तापलेला, लांबच लांब रस्ता पावलांखाली !
पण
न दिसणाऱ्या पाखरांच्या
सावल्यांचे तुकडे
अभावितपणे
देऊन जातात दिलासा
तेव्हा तळावलेल्या डोळयांत
आकाशाचे प्रतिबिंब उतरते
नि रखरखीत उन्हाच्या झळा सोसणे
कसे अलगद होऊन जाते !
**

४०

माझ्या ओंजळीत येऊन
अडकलेले कोवळे ऊन
काही केल्या
मला लपवता येईना
म्हणून
मुक्तपणे
मी ते उधळून दिले.
तरी निर्व्याजपणे
पुन्हा पुन्हा
ओंजळीत येत
ते माझा चेहरा
उजळीतच राहिले !
**

४१

उचललेल्या प्रत्येक पावलात
असते मिजास.
प्रत्येक क्षण ताजा होऊन
घेतो श्वास !
संभ्रमांचे हट्टी पडदे
होतात दूर.
आयुष्याला लागून जातो
नवा सूर !
अशा वेळी नको काढूस
उणे-दुणे
पुसून टाक मनामधले
जुने कुढणे !
सारे चढ चढून होतात
भराभर
दुःखं सुद्धा झेलता येतात
वरच्यावर !
मैलोगणती अंतर मधले
सहज सरते.
पिवळ्यामधले हिरवेपण
नजरेत भरते !
अशा वेळी आठवू नकोस
वांझ दिवस
ओठात शीळ येईल तेव्हा
गात बस !
**

४२

श्वास माझे
गंधवेडे
जाहलेना,
पावसाचे
थेंब तेव्हा
शब्द झाले !

या क्षणांनी
चालताना
ताल धरता,
निर्झराच्या
वाहण्याचे
गीत झाले !
**

४३

सुख सुद्धा दंश करतं !
आनंदही
होतो अनावर
घशाला कोरड पडते
उडून जाते झोप
मन सैरभैर होतं
रक्त उसळत राहातं
हसता हसता
आतड्यांना पडतो पीळ
नि डोळ्यांत
पाणी जमतं
हो,
सुख सुद्धा दंश करतं !
**

४४

न उकललेले कितीतरी प्रश्न
निष्प्रभ होऊन पडलेत
मनाच्या सांदीकोपऱ्यात.
भोवतीची उद्विग्नता पाहणाऱ्या डोळ्यांवर
चढलीय एक आत्ममग्न धुंदी !
अस्वस्थतेची धग
निवू लागलीय
सुखाच्या सुगंधित शिडकाव्यांनी !
नवागत क्षणांच्या दमदार पावलांना
दुःखाची साधी तोंडओळखही नाही !
अशा निवांत प्रहरी
सांगू नकोस मला कुंतीची गोष्ट
आणि देऊ नकोस आठवण
तिनं मागून घेतलेल्या वरदानाची !
**

४५

चल आपण जगण्यावरती प्रेम करूया
येईल तसं अर्धंमुर्धं गाणं गाऊया

गाण्यापेक्षा गाणारं मन मला प्रिय वाटतं
पोचण्याइतकंच चालण्याचंही श्रेय मला मोठं वाटतं
पानांसारखं गळून पुन्हा फुटत राहूया

माझ्यापाशी हिरवा रंग तुझ्यापाशी निळा
कधीतरी पांढरा आणि कधीतरी काळा
असेल तशा रंगात चल रंगून जाऊया

हट्टी असे काही क्षण एकाच जागी अडून बसतात
थांबावेसे काही क्षण बघता बघता निसटुन जातात
क्षणांचा हा खेळ सारा थोडा दुरून पाहूया

ही बाग हा खेळ आपला नाही
खेळणं आपलं, हारजीत आपली नाही
आपलं तेवढंच मिजासीत मिरवत जगूया !
**

४६

अचानक कोसळले संकट
तरी ती कोसळली नाही !
उभी राहिली ताठ !
सावरत राहिली इतरांना.
घालत राहिली बांध
फुटू पाहाणाऱ्या आवेगांना !
ती सावध होती.
झाली होती त्रयस्थ.
तिला माहीत होते-
हळुहळू पांगतील सारे समजावणारे,
मायेचे हात होतील कठोर,
बघता बघता निवळेल आकाश
आणि वाराही वाहू लागेल नेहमीसारखा !
मग आख्ख्या आयुष्याला सामोरं जाताना
प्रत्येक क्षणी ती एकटीच असेल !
त्या क्षणांसाठी
ती साठवत होती बळ,
सांभाळत होती अश्रू जिवापाड !
ती निकरानं उभी होती
निःशब्द, शांत !
अन लोक म्हणत होते...
हिला वेड लागेल
हिला रडवायला हवी !
**

४७

सारी आवराआवर करून
मधल्याच स्टेशनवर उतरल्यासारखी
ती तिथं आली !
तिच्याबरोबर कुणीच नव्हतं.
ती अधीरतेनं वाट पाहात होती
अंधार होण्याची !
त्या निर्जन माळावरच्या
पाठमोऱ्या उजेडाचं अस्तित्वही
तिला असह्य झालं !
सगळे पाश निकरानं तोडून आल्यावर
लगेचच अंधाराचं बोट धरून
तिला निघून जायचं होतं !
पण मावळता प्रकाश
तिच्या डोळयांपुढून हटता हटत नव्हता
‘काही क्षण अंत पाहणारेच असतात’
ती पुटपुटली.
निळा.... सावळा.. काळा होत
मग प्रकाश दिसेनासा झाला
तशी त्याचेच बोट धरून
शेवटचा निश्वास टाकत
अनंताच्या प्रवासाला ती निघून गेली !
**

४८

जाता जाता
सहज फेकले तिने
चार दाणे बाजूच्या माळरानात
आणि हात झटकून
चालू लागली मोकळ्या मनानं !
त्या ओसाड जमिनीत
काही रुजून बहरण्याची
शक्यताच नव्हती !
पण काही अनोळखी पाखरांनी
टिपले ते दाणे
नि खाता खाता
विखरून टाकले चहुबाजूला !
परतीच्या प्रवासात
ती बेदखल !
पण तिला जाणवला
एक सुखद गारवा !
तिनं पाहिलं सभोवती-
बाजूचा बहर
तिला खूप जुन्या ओळखीचा वाटला !
त्याचे पडसाद उमटले तिच्या मनावर.
ती गुणगुणू लागली
तिच्याही नकळत !
अन जन्मापासूनचे
तिचे मौन सुटले !
**

४९

शब्दांची पाखरं
त्याच्या अंगणात
आपल्या उत्सुक चोची वासून
अधिरतेनं वाट पाहात असतात
दार किलकिलं होण्याची
आणि बंद दरवाज्याच्या आत
तो वाट पाहात असतो
साक्षात्कारी क्षणांची !
त्याच्या अंगणातील पाखरांना
माहिती आहे
त्याच्या कठोर व्रताची
आणि त्यालाही जाण आहे
पाखरांच्या समंजसपणाची !
दार किलकिले होते
त्या प्रत्येक वेळी
उल्हसित करणारा सुगंध येतो
निश्वासासारखा !
पाखरांना चाहूल लागते कसलीशी...
त्यांची उत्सुक पावलं पुढे सरसावताच
मिळतात त्यांना अस्सल मोत्याचे दाणे
नि त्यांच्याही नकळत घुमू लागते दशदिशांत
त्यांच्या चोचीतले आर्त, विरागी गाणे !
**

५०

पंचेंद्रियांची शक्ती बोटांमध्ये एकवटून
त्या प्रचंड पाषाणाचे आव्हान पेलत
अनेक वर्षांच्या सवयीने
एक अव्दितीय शिल्प बनविण्यात
तो गढून गेला होता !
कोण जाणे कशाने
पण अचानक तो विचलित झाला.
त्याने वर पाहिले-
निसर्गाचे विलक्षण रूप
नेहमीसारखेच सर्वदूर पसरलेले
त्याच्या डोळ्यांनी
एखाद्या साक्षात्कारासारखे अनुभवले !
छिन्नी हातोडी त्याच्या हातातून गळून पडली.
स्वतःतून उठून त्याची नजर
निसर्गाचे ते नित्यनूतन रूप निरखण्यात गढून गेली.
आत मावेनासे झाले
ते नेत्रांतून पाझरू लागले !
दशदिशांतून उमटणारे
रंगगंधांचे निरागस उद्‌गार
त्याला लोभस शिल्पाप्रमाणे दिसू लागले !

अननुभूत आनंदाने तो कासावीस झाला !
अन हातातले शिल्प तसेच अर्धवट टाकून
तो धावत सुटला

आतून विस्कटून गेल्यासारखा !
आत्तापर्यंत घडवलेली सगळी भव्य शिल्पे
त्याला त्या क्षणी
अगदी क्षुद्र वाटू लागली !
तो सुन्न झाला.
हरवल्यासारखा तासनतास
निष्क्रीय बसू लागला.
त्याचे कसबी हात
निष्प्राण, लाकडासारखे झाले !
सारेजण हळहळले.
त्यांना वाटलं हा वेडाच झाला !
एक असामान्य कलाकार
असा कसा वठून गेला ?
कुणाला कळण्यासारखे नव्हतेच ते अघटित !
त्याला स्वतःला तरी कुठे कळत होते
की त्याच्यातील गोठलेल्या कलाकाराच्या
विलयबिंदूकडे
तो खेचला जातो आहे म्हणून !
**

५१

गर्भश्रीमंत म्हणून जन्माला आला
पण त्याने पाहिली
भणंग आयुष्याची स्वप्ने !
तसा तो गुंतलाही मोहात उपभोगांच्या
अगदी रुतल्यासारखा !
पण बघता बघता कुणी ओढून न्यावे
तसा तो मधेच परागंदा व्हायचा.
कफल्लक होऊन कधीतरी परतायचा.
पराभूत, घायाळ !
त्याचे असे जाणे-येणे चालूच राहिले.
बाजूचे लोक हताश, असहाय्य !
त्यांना समजायचेच नाही
की याला का नाही मानवत वसंत ?
कुणी म्हणाले गतजन्मीचा भोग...
कुणी काही, कुणी काही म्हणत राहिले !
नि एक दिवस,
सोन्यासारखा संसार उधळून
तो निघून गेला.

कुणी बोलावू नये परत
म्हणून माणसातूनच उठला !
अखेर त्याचे स्वप्न साकारले !
सारे व्यथीत झाले
एक राजस आयुष्य उद्ध्वस्त झाले म्हणून !

त्याचे मात्र काहीच कळले नाही शेवटपर्यंत !
चिवटपणे तग धरून
चारचौघांसारखे आयुष्य सांभाळीत
कसेतरी जगत राहण्यापेक्षा
असे आरपार विस्कटून जाणेच
त्याला मनस्वीपणाचे वाटले असेल का ?
**

५२

आपला जन्मांधपणा
खुशाल नजरेआड करून
तो खेळत असतो सहजपणे रंगाशी !
कधी दाटून येतो अंधार मनात
अनावर होतो
तेव्हा तो रंगपेटीतील रंग कुरवाळत राहतो.
एखादा रंग रुणझुणतो कानांत,
एखादा उत्कट गंध घेऊन येतो !
बोटांपाशी आलेल्या रंगांनी
मग तो रंगवून टाकतो अंधार
तेव्हा एक चित्र साकारते !
(ते त्याचे सेल्फ पोर्टेट असते ! )
जे पाहू शकतात रंगांचे फक्त रूप
ते आपण अवाक होतो चित्र पाहून.
आपण डोळ्यांनी पाहतो रंगछटा
साक्षात समोर असलेल्या
आणि जाणू पाहतो तर्काने त्यापलिकडचे !
पण गवसत नाही आपल्या तर्काच्या कुपीत
चित्रातील रंगात त्याने मिसळून दिलेला गंध !
त्याला स्पर्शातून समजलेली रंगछटा
गुणगुणत असते
ते गाणेही आपल्या हृदयाला भिडत नाही
आपल्याला दिसतात फक्त गहिरे रंग
खरे चित्र कधी समजतच नाही !
**

५३

तो अजस्त्र काळा कातळ
साऱ्यांना तुच्छ लेखत
सहज झेलत होता अंगावर
वरून कोसळणारे पाण्याचे प्रचंड प्रपात !
वाहू देत होता अंगावरून
पाण्याचे लोटच्या लोट
त्यातील अनावर आवेगांसह !
त्याला गर्व होता आपल्या अभेद्य कवचाचा
आणि आतील अलिप्त कोरडेपणाचाही !
त्याने निकराने जपले आपले अभेद्यपण !
कित्येक पावसाळे आले गेले-
त्याने पाझरू दिलेच नाही आत काहीही !
एक दिवस अचानक
झुळझुळू लागले त्याच्या आतच काहीतरी.
अनावर झाले !
तो समुळ हलला...
वरून कोसळणारे पाण्याचे प्रचंड प्रपात
सहज झेलणारे त्याचे अभेद्य कवच
थरथरू लागले
ओठ थरथरावेत तसे !
नि मग अवघड झाले
आतला पाझर लपविणे आणि सोसणेही
अवघड झाले !
**

५४

अथांग निळ्या आकाशाचं प्रतिबिंब पचवून
निळाच झालेला समुद्र,
आतील लयदार खळबळ छाताडावर मिरवीत
क्षितिजापर्यंत पसरलेला...
अन किनाऱ्यावर
निर्विकारपणे दूरवर पसरलेली वाळूच वाळू !
धरती, समुद्र आणि आकाश
इतके जवळजवळ, तरी अलिप्त !
अशा शांत, निरामय जागी
तो रोज यायचा !
पाहात राहायचा बराच वेळ
सृष्टीचे ते अद्भुत असणे !
नि मग, मिटून घ्यायचा नेत्र कितीतरी काळ !
त्याला काय गवसायचे कोण जाणे !
पण केव्हातरी त्याचे सराईत हात
वाळूत फिरू लागायचे.
आजुबाजूच्या केवढ्यातरी वाळूचा ढीग
बघता बघता आरपार बदलून जायचा.
नि धारण करायचा रूप एखाद्या सुंदर शिल्पाचे !

शेवटचा पूर्ततेचा हात फिरवून होताच
तडक उठून तो निघून जायचा
एखादा तारा निखळावा तसा !
सागरलाटांचे किनाऱ्याशी झोंबणे चालूच असायचे.
एकामागोमाग दोन तीन वेगवान लाटा

धावत आल्या की परतताना
उभे केलेले सारे सपाट करून जायच्या-
त्या अपौरुषेय वाटणाऱ्या सुंदर शिल्पासह सारेच !
तरी, खेचून आणल्यासारखा
तो परत परत यायचा तिथे
प्रथमच यावे तसा !
प्रत्येक वेळी
तेच कोरे मन
आणि
सपाट झालेला निर्विकार समुद्रकिनारा !
**

५५

विविधरंगी असत्याचे बुरखे
त्याने टरकावून काढले
आणि वास्तव उघडे केले
तेव्हा त्याचे टाळयांच्या गजरात स्वागत झाले !
कुणीतरी हे करायलाच हवे होते !
मग त्याच्या तीक्ष्ण नजरेला दिसले
दिशाभूल करणारे मोहक मुखवटे.
त्याने तेही ओरबाडून काढले
नि सत्याचे दर्शन घडवले !
तेव्हा त्याच्या गळयात फुलांचे हार पडले
हेही कधीतरी व्हायलाच हवे होते !
पण मुखवटे ओरबाडून काढता काढता
त्याच्या हातातील शस्त्राला चटक लागली
वास्तव उघडे करत जाण्याची,
नि मस्तकात भिनली नशा !
आता-
जिवंत हाडांचा सापळा,
ताजे उष्ण रक्त
आणि लसलसणाऱ्या मांसाच्या वास्तवावर
कशाला हवे आहे झाकापाक करणारे
हे त्वचेचे आवरण ?
असे म्हणत
तो चेहरेच सोलत निघाला आहे !
**

५६

पुन्हा बरसले
निवले मेघ
पुसून गेली
काळी रेघ

वाहुन गेले
सारे रान
तरीहि मागे
उरले पान

वादळ वारे
आले खूप
बदलुन गेले
अवघे रूप

सुगंध आला
भुईमधून
फुटला अंकुर
जरा थिजून !
**

५७

कवितेला तर नाहीच
कवितेखालीही नसावे कुणाचे नाव !
नसावे तिला कुठल्याच संदर्भाचे आवरण.
नुसते रुळावे तिने ओठांवर आपल्या सहज लयीत
जात्यावर म्हटल्या जाणाऱ्या अनाम ओवीसारखे !
असावे तिने अलिप्त, निरामय
एखाद्या शांत सरोवरासारखे.
जितकी भेदक नजर, जाणवावेत
तितके खोलातले आशयाचे तरंग.
थेट स्पर्शावे तिने मनातल्या संदिग्ध आशयाला.
थरथरावे काही खोलवरचे.
अक्षरातून उठून घर करावे मिटलेल्या काळजात
नि उमलवावीत भावफुले सगुण रूपात !
शब्दांचे बोट धरून निघालेल्या प्रत्येकाला
लागू नये एकाच अर्थाचे गाव.
कवितेला तर नाहीच,
कवितेखालीही नसावे कुणाचे नाव !
**

५८

ऋतूंचे उरी फुटून
मोकाट कोसळणेही
किती सहज वाटते
मन तरुण असते तेव्हा.
एरव्ही अंगावर येतात
कोवळे बहरसुद्धा !
**

५९

काल-परवापर्यंत
मी निःशंक जगत होते !
खुशाल वावरत होते-
माणसांच्या घोळक्यातून,
वाहनांच्या गर्दीतून
कधी पक्ष्यांनी नादावलेल्या
वृक्षांच्या सावलीतून...
कारण तेव्हा मी
माणसांना माणसं
वाहनांना वाहनं
वृक्षांना वृक्ष
नि पक्ष्यांना पक्षी मानत होते !
काल अचानक जाणवलं-
ही माणसं, वाहनं, वृक्ष, पक्षी...
सगळे आरसे आहेत !
तेही अंतर्गोल, बहिर्गोल, साधे, पारा उडालेले...
अन मी,
वावरताना सांडते आहे या साऱ्यांत
विक्षिप्तशा प्रतिमा बनून !
आता जगताना मी बावरलीय
कळत नाहीय-
कशी झाकून घेऊ स्वतःला ?
फोडून टाकू सगळे आरसे ?
की मिटून घेऊ डोळेच फक्त ?
**

६०

इंद्रधनुषी रंगाचे चक्र
गरागरा फिरू लागले
की सारे
पांढरेच दिसू लागते.
तसे झाले आहे
या सप्तरंगी दिवसांचे !

वाटतंय, विश्रांतीसाठीही न मावळणारा
एकच एक भला मोठा दिवस
जगतोय आपण !

ही कसली गती भिनलीय अंगात
जी नेत नाही कुठेच ?

हे कालचक्र असं बेभान होऊन कोण फिरवतंय ?
की आपणच फिरतो आहोत
भोवळ आणणाऱ्या गतीने ?

डोळे उघडले की दिवस
नि मिटले की रात्र झाल्यासारखे वाटते आहे.
न वाचताच भराभर उलटली जावीत पाने
एखाद्या पुस्तकाची
तसे आयुष्य झाले आहे !
**

६१

शरीरात जागोजाग चाललेले
पेशींचे रणतुंबळ युद्ध
आणि
मेंदूतील अनावर उद्रेक
त्वचेच्या वस्त्राआड
काळजीपूर्वक झाकून
किती सहज
वावरत असतात माणसं !
**

## ६२

भर रस्त्यात
असतो आपण एकाकी
आणि तरीही असतो स्वस्थ
त्या अनोळखी गर्दीच्याच सोबतीने !
कोणत्या अदृश्य धाग्यांनी
बांधलेले असतो आपण एकमेकांशी ?
कोणते अनाम नाते असते आपल्यात
जे टिकून असते
नावाशिवाय
संदर्भाशिवाय
संवादाशिवाय ?
**

६३

समोरचा
हा अर्धी अधिक पाने झडून गेलेला वृक्ष
दिसतो आहे वठल्यासारखा.
पण कोण जाणे का-
वाटते आहे
की याच्या जुनाट खोडाने
आपल्या निबर कवचाआड
थोपवून धरला आहे
कुण्या वसंताने देऊ केलेला
ओसंडून वाहणारा बहर
आणि
अखंड जीवनरस पुरविणाऱ्या आपल्या मुळांवर
ठेवली आहे करडी नजर !
कोण जाणे का !
**

६४

दे अपार तृष्णा
शमवाया नकोस येऊ

दे अपार करुणा
कवळाया फुटोत बाहू

दे अपार शक्ती
त्या फुटलेल्या बाहूंना

अन नको संपवू
या आंतरातल्या वेणा !
**

६५

बुंध्याशी बांधलेल्या
दगडी पाराला न जुमानता
सुसाट धावत असतात मुळं
जमिनीत खोलवर
पाण्याच्या शोधात !
तरी
जमिनीखालच्या
त्या अथांगतेतही
भागत नाही
अशी आणखी कुठली तहान असते
वटवृक्षाला
जी शमविण्यासाठी
विस्तारलेल्या फांद्यानाही
फुटतात मुळं
नि लोंबकळत राहतात
पारंब्या बनून ?
**

६६

शिंपल्याच्या दारापाशी
पावसाचा थेंब

कमळाच्या पाकळीशी
थांबलेला भृंग

ज्ञानेशाच्या ताटीपाशी
उभी मुक्ताबाई

बंद गाभाऱ्यात आहे
व्याकुळ विठाई !
**

६७

या विश्वाच्या पवित्र, सुंदर अशा
रूपापलीकडील
रुद्रभीषण, कुरूप आणि बीभत्स
अशा रूपाचे वास्तवही
जाणले होते संतानी
पण
त्यांच्या विस्तारलेल्या प्रकाशमान जाणीवेत
आत्मानुभूतीने तळपत होते एक सत्य-
‘या विराट विश्वातील प्रत्येक अणुरेणूत
ईश्वराचा अंश आहे !’
म्हणून पाहू शकले ते
अवघ्या आस्तित्वाकडे
सारख्याच करूणामय दृष्टीने !
अन तरी
‘सत्यं शिवं सुंदरं’ लाच पूजत राहिले !
प्रार्थत राहिले-
‘तमसो मा ज्योतिर्गमय
मृत्योर्मा अमृतं गमय’....
कारण
त्यांना माहीत होते
उताराच्या दिशेने धावणारे जीवन
अशा प्रार्थनांनीच
काही काळ तरी रोखता येईल !
**

६८

पापण्यांची कवाडं
घट्ट मिटून घेतली
तरी हा कुठला उजेड
माझी झोपमोड करतो आहे ?
दोन्ही हातांनी
गच्च झाकून घेतले कान
तरी ही कुणाची साद
मला बाहेर खेचते आहे ?
जाणून-बुजून स्वीकारले मौन
तरी कसा अर्थ पोचतोच आहे
कुणाकुणापर्यंत ?
प्राणांपर्यंत आक्रसून घेतले स्वतःला
तरी कोणते मोरपीस
हलकेच उठवू पाहाते आहे रोमांच
शरीरावर ?
एकेक करत
नाकारू पाहतेय जगणं
तरी एका संथ लयीत
अलिप्तपणे
माझ्याच शरीरात
माझ्यासाठी
कोण घेतं आहे श्वास ?
फुलांच्या नकळत
जसा दरवळतो सुवास ?
**

६९

दूरात डोंगरावरती
ही नजर धावते रोज
पापणीत टिपुनी घेते
घननीळ नभाचा साज

मन गच्च सुखाने भरले
धावते तरीही दूर
आकाशपोकळीमध्ये
शोधते नवे काहूर

मग रिक्तपणाने भरते
हुरहूर लपेटून घेते
मन घरी परतते तेव्हा
आकाश घेउनी येते

हे असे रिकामे होणे
मन भरून घेण्यासाठी
धावणे, परतणे असले
आयुष्य समजण्यासाठी !
**

७०

वर्षे
नुसती जात नाहीत कधी.
जाताना
देऊन जातात
त्वचेला एकेक सुरकुती !
**

७१

प्रचंड गतिमान शक्ती
बांधून निराकारात
उधळून दिलीस मुक्तपणे !
नि गंमत म्हणून
पुन्हा देऊ केलेस वेगवेगळ्या देहाचे आकार
प्रत्येक चैतन्यकणाला !
कैद केलेस,
अगतिक केलेस गतीला !

चालले असते
भक्कम दगडी भिंतीत
चिणले असतेस तरी.
दुभंगून बाहेर पडता आले असते !
पण
तुझे हे निराकाराचे प्रेम...
भेदायचे कसे नि काय ?

चक्रीवादळासारखे
घुमत राहायचे तळात
जागच्या जागीच.
नि नीरव अथांगता पांघरून
भासवायचे निःस्तब्ध असल्याचे !

वर्षानुवर्षे राहायचे
गजबजलेल्या,

इथून पार तिथवर पसरलेल्या
भव्य शहरात
नि कुणीतरी गळयात दोरी बांधून फिरवावे
तसे, तेवढेच धावायचे
त्याच त्या परिचित रस्त्यांवरून
अनोळखी प्रदेशांची ओढ नाकारून !

सारे बळ एकवटून
चक्रव्युहात शिरायचे
एखाद्या झुंजार योद्ध्यासारखे.
नि आतल्या आत लढत राहायचे
आपल्याभोवती कडं केलेल्या
आपल्याच रूपातील शत्रुंशी !
**

७२

बाहूंना दिलीयस अभिलाषा
अवघे विश्व कवटाळायची
नि नेत्रांना
सारे सौंदर्य पिऊन घ्यायची.
पेरून ठेवलेयस पेशीपेशीत
चिवट मातीपण
नि बांधून ठेवलेयस पायात
मोहाचे पैंजण
मनसोक्त रमावे
तूच निर्मिलेल्या सृष्टीत म्हणून !
मग का गुणगुणतोयस एकसारखा
‘इदं न मम इदं न मम’
आतून अगदी आतून ?
**

७३

हे मधले अंतर
अनावर का वाढते आहे ?
जमीन खचते आहे ?
की आकाश दुरावते आहे ?
आक्रसून मीच
एक ठिपका होते आहे
की माझी जाणीव विस्तारते आहे ?
हे मधले अंतर अनावर
का वाढते आहे ?
**

७४

कित्येक असे जे फिरवून पाठ गेले
ते नाळ स्वतःची सवेच घेउन गेले
निष्ठेने गेले शोधायाला काही
भोगांचे देणे देउन झाले नाही

नाळेत अडकले पाय, यत्न डळमळले
भोगांनी त्यांना खेचुन मागे नेले
दबलेल्या इच्छा पेटुन उठल्या जेव्हा
विझलेली गात्रे रडू लागली तेव्हा

देऊन जायचे आसक्तीचे देणे
ठेवून जायचे कंठामधले गाणे
पाठीवर पडता वैराग्याची थाप
उघडेल आतली ताटी आपोआप !
**

७५

हरलेल्यांनो
तुमचे पतन
व्यर्थ नाही झाले !
पतनाच्या जागी
त्यांनी
इशाऱ्याचे स्तंभ रोवले !
**

७६

निर्गुण निराकार ईश्वरालाच
प्रिय सखा मानून
आपली सारी व्याकूळता,
अधीरता,
नि आतील अनावर कोलाहल
त्याला आर्त आळवण्यातून
पाझरू द्यायचा
आणि
मनातील अनाम वेदनेला
भक्तिरूप देऊन
अवघा कल्लोळ शांतवायचा !
ही उदात्त कल्पना
मीरे,
तुला सुचली तरी कशी ?
**

७७

मला चिकटलेले
सगळे संदर्भ
शिशिराची वाट पाहतायत.
तुझ्याकडे येताना
मी निःसंग व्हायला हवं
हो ना ?
**

७८

जसे अनंताचे गाणे
कुणी शब्दातून गाते
देहा-पल्याडची वाट
याच देहातून जाते

भोळ्या संभ्रमांचे ढग
रोज उतरती मनी
कधी संथ कधी लाटा
तरी वाहतेच पाणी

जे जे दारी येते त्याला
स्वच्छ आपुले म्हणते
मना-तळाच्या मातीत
काही रुजवू पाहते

माझ्यातुनी कधी तरी
मीच उगवेन अशी
देहाविना नवा जन्म
आणि नाते जीवनाशी !
**

७९

त्या डोंगरावरून
पलीकडे गेल्यावर
लाभेल माझ्या पावलांना
डोंगराची उंची !
नि सहजच दिसेल सारे
लखलखीत उन्हासारखे !
संभ्रमाच्या सावल्यांनाही
असेल स्वयंभू अर्थ
नि प्रत्येक क्षणाची नक्षी
प्रकटेल आंतरिक बारकाव्यासह !
असेल तिथे प्रकाश
केव्हाच उगवल्यासारखा
आणि मी असेन,
म्हणजे अंधारही असेलच
माझ्या सावलीसारखा !
ही सावली सोबत असेल
तोपर्यंत, मी चालतच राहीन
त्या डोंगरापलीकडच्या
आणखी एखाद्या डोंगरापलीकडे
जिथे असेल सारे एकाकार
अवघ्या तपशीलांच्या पार
असे सत्यासारखे शून्य !
ते असेल इथल्या, अलिकडच्या
अज्ञानासारखेच.
फक्त तिथे त्याचे नाव ज्ञान असेल !
**

८०

एखाद्या हिमनगाने
वितळून जावे अथांग सागरात
तसे वितळून जाईन म्हणते
दिशांच्या ऐलपैल विखुरलेल्या जाणीवेत !
त्या निराकार अवस्थेत
मग एवढेच उरेल करायचे...
कुणाच्याही लेखणीतून
कुंचल्यातून
कंठातून
पाझरलेल्या स्व-रूपाकडे पाहात
गहिवरून यायचे ओतप्रोत
आणि
अनंत आकाशातील
स्थिर-अस्थिरातून
सृष्टीच्या श्वास-निश्वासातून
भूगर्भात उमटणाऱ्या हुंकारातून
व्यक्त होणाऱ्या अपार करुणेत
लोटून द्यायचे सारे स्रोत !
एवढेच उरेल करायचे ! !
***



**आसावरी श्रीनिवास काकडे**

**बी.कॉम., एम.ए. मराठी,**

**एम.ए. तत्त्वज्ञान**

**प्रकाशित पुस्तके-**

**गद्यलेखन-**

*‘कवितेभोवतीचं अवकाश’ (लेखसंग्रह)

*ईशावस्यम् इदं सर्वम्: एक आकलन-प्रवास’ (तत्त्वज्ञान)

* ‘अथांग’- (अनुवादित कादंबरी) बिन्द्या सुब्बा यांच्या ‘अथाह’ या साहित्य अकादेमी पुरस्कार प्राप्त मूळ नेपाळी कादंबरीचा मराठी अनुवाद.

* आनंदी गोपाळ (कादंबरी- संक्षिप्त आवृत्ती) श्री. ज. जोशी यांच्या आनंदी गोपाळ या कादंबरीचे मुलांसाठी संक्षिप्तीकरण

**कवितासंग्रह-**

मराठी- ९ :

‘आरसा’, ‘आकाश’, ‘लाहो’, ‘मी एक दर्शनबिंदू’, ‘रहाटाला पुन्हा गती दिलीय मी’, ‘स्त्री असण्याचा अर्थ’, ‘उत्तरार्ध’, ‘व्यक्त-अव्यक्ताच्या मध्यसीमेवर’ आणि ‘भेटे नवी राई’

हिन्दी- ३

‘मौन क्षणों का अनुवाद’, ‘इसीलिए शायद’, आणि ‘मेरे हिस्से की यात्रा’- (स्वतःच्या निवडक मराठी कवितांचा हिन्दी अनुवाद. या हिंदी अनुवादाचा तमिल अनुवाद प्रकाशित झाला आहे.)

अनुवादित- ४

* ‘बोल माधवी’ (चन्द्रप्रकाश देवल यांच्या ‘बोलो माधवी’ या हिन्दी कवितासंग्रहाचा अनुवाद),

* ‘तरीही काही बाकी राहील’ (विश्वनाथ प्रसाद तिवारी यांच्या निवडक हिन्दी कवितांचा अनुवाद),

* ‘लम्हा लम्हा’ (दीप्ति नवल यांच्या ‘लम्हा लम्हा’ या कवितासंग्रहाचा अनुवाद),

* ‘तू लिही कविता’ (डॉ. दामोदर खडसे यांच्या ‘तुम लिखो कविता’ या कवितासंग्रहाचा अनुवाद)

बालगीतसंग्रह- ५ : ‘टिक टॉक ट्रिंग’, ‘अनु मनु शिरू’, ‘जंगल जंगल जंगलात काय?’(इसाप गाणी), ‘भिंगोऱ्या भिंग’, आणि ‘ऋतुचक्र’

ब्लॉग्ज- ‘ब्लॉग, एक नवी सुरुवात’ या ब्लॉगमधे विषयानुसार बनवलेले दहा ब्लॉग्ज एकत्रित.

(http://www.asavarikakade.blogspot.com)

**काही महत्त्वाचे पुरस्कार-**

* ‘बोल माधवी’- साहित्य अकादेमी, नवी दिल्लीचा अनुवाद पुरस्कार २००६

* ‘इसीलिए शायद’- केंद्रीय हिंदी निदेशालय, नवी दिल्लीचा ‘हिंदीतर भाषी हिंदी लेखक पुरस्कार

* ‘मेरे हिस्से की यात्रा’- महाराष्ट्र राज्य हिन्दी साहित्य अकादमीचा संत नामदेव पुरस्कार

* ‘आरसा’ आणि ‘मी एक दर्शनबिन्दू’ या संग्रहांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार

* बालसाहित्यासाठी औरंगाबादच्या परिवर्तन संस्थेचा कै. ग.ह. पाटील पुरस्कार

* ‘कवितेभोवतीचं अवकाश’- आचार्य अत्रे स्मृति प्रतिष्ठान केशवकुमार आचार्य अत्रे पुरस्कार

* ‘ईशावस्यम् इदं सर्वम्...’- सार्वजनिक वाचनालय, नाशिकचा ग. वि. अकोलकर पुरस्कार.

* एकूण लेखनासाठी गो. नी.दांडेकर स्मृति ‘मृण्मयी’ पुरस्कार,

* पुणे मराठी ग्रंथालय, पुणेचा साहित्य सम्राट न. चिं. केळकर पुरस्कार

**इतर सन्मान**

* इयत्ता सातवी ते एम. ए. पर्यंतच्या विविध वर्गांच्या अभ्यासक्रमात व विविध संपादित संग्रहांमधे वरील संग्रहांमधील कवितांचा समावेश.


* आकाशवाणी, नवी दिल्ली तर्फे आयोजित सर्वभाषी कविसंमेलनात(२००२) मराठीचे प्रतिनिधित्व


* हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग (अलाहाबाद) द्वारा ‘सम्मेलन सम्मान’- २००४


* अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासह अनेक महत्त्वाच्या साहित्यिक कार्यक्रमांमधे कवितावाचन, निबंधवाचन, भाषण अशा प्रकारचा सहभाग.

## आसावरी काकडे यांची ई साहित्यवरील इतर ६ पुस्तके

## कव्हरवर एकच क्लिक केले की पुस्तक उघडेल

















लाहो म्हणजे ध्यास.
तुकारामांच्या गाथेतला हा शब्द.
आपल्यातील आंतरिक मर्यादांच्या
पार होण्याच्या संदर्भात
मला तो भावला
आणि कवितासंग्रहाचे शीर्षक म्हणून
मनात रुजला.



कॉन्टिनेन्टल